# MT 147

**2017 ___ ___ 1100**

**-MT-147- SOCIAL SCIENCE - HISTORY & POLITICAL SCIENCE (M)-**
**SEMI PRELIM I - PAPER - B**

**Time : 2 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 40**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **(अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| (१) | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना झाली. | **1** |
| (२) | अमेरिका व त्यांची मित्र राष्ट्रे **नाटो** कराराद्वारे एकत्र आली. | **1** |
| (३) | उदारीकरणाचे धोरण प्रत्यक्षात उतरवण्यासाठी **खाजगीकरण** करण्याची गरज असते. | **1** |
| उ.१. | **(ब) 'अ' स्तंभ व 'ब' स्तंभ यांच्या योग्य जोड्या लावा.** | |
| (१) | दादाभाई नौरोजी - मवाळ | **1** |
| (२) | नेल्सन मंडेला - दक्षिण आफ्रिका | **1** |
| (३) | विक्रम साराभाई - भारतीय अवकाश संशोधनाचे अध्वर्यू | **1** |
| उ.२. | **खालील प्रश्नांची २० ते ३० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | (१) विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया सुरु झाली.<br>(२) युरोपीय राष्ट्रांना वसाहतीमधून माघार घ्यावी लागली. 'जगा आणि जगू द्या' असे शांततामय व मानवतावादी धोरण अवलंबले खरे; परंतु श्रीमंत, भांडवलशाही, विकसित देशांची व्यापाराची लालसा कमी झाली नाही.<br>(३) त्यांना व्यापाराचे नवे मार्ग शोधण्याची गरज वाटत होती. त्यातूनच श्रीमंत राष्ट्रांची 'जी-७' ही संघटना उदयाला आली.<br>(४) जगात कोठेही वसाहती नसतानाही अनिर्बंध व्यापार करण्यास सुरुवात झाली. या नव्या धोरणाचे नाव 'जागतिकीकरण' होय. | **2** |
| (२) | (१) दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुध्दाचा प्रभाव जाणवू लागला. परंतु त्याचा प्रारंभ इ.स.१९१७ च्या रशियातील बोल्शेव्हिक क्रांतीमध्ये आहे.<br>(२) या क्रांतीने रशियात कार्ल मार्क्सच्या विचारांवर आधारित साम्यवादी राजवट निर्माण झाली.<br>(३) साम्यवाद व भांडवलशाही या पध्दती परस्परांच्या पूर्णपणे विरोधी आहेत.<br>(४) यामुळे अमेरिका व पश्चिम युरोपीयन राष्ट्रांना रशियन साम्यवाद हा आपल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेस मोठा धोका व आव्हान असल्याचे वाटू लागले.<br>(५) रशियातील साम्यवादामुळे युरोपीयन राष्ट्रांतील शत्रुत्व वाढीस लागले. | **2** |
| (३) | ब्रिटिशांनी भारतात राज्यकारभाराच्या सोयीसाठी पुढील सुधारणा केल्या.<br>(१) सर्वांसाठी समान कायदा पद्धती अस्तित्वात आणली.<br>(२) रेल्वे, रस्ते व टपाल यासारख्या दळणवळणाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली. | **2** |

| | | |
|---|---|---|
| | (३) पाश्चात्त्य शिक्षणाची सुरूवात केली.<br>(४) छापखाने काढून विविध विषयांवरील ग्रंथनिर्मितीस प्रारंभ करून वर्तमानपत्रे व नियतकालिके काढली. | |
| उ. ३. | **खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत कारणे लिहा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | (१) संगणकाच्या शोधामुळे कामाची गती वाढली आहे. कामातील अचुकता साधली आहे.<br>(२) कामाची गुणवत्ता वाढली आहे. माहितीचे असंख्य स्त्रोत उपलब्ध झाले आहेत.<br>(३) माहितीचे जतन व संवर्धन हे संगणकामुळे शक्य झाले आहे. जग एका छोट्या खोलीत उपलब्ध झाले आहे. यंत्र मानवाची निर्मिती ही संगणकामुळेच शक्य झाली. आज अतिशय अवघड व अशक्य काम संगणकामुळेच शक्य झाले आहे.<br>(४) संगणकामध्ये माहिती साठवून ठेवणे, प्रक्रिया करणे, लिहिणे, वाचणे, गणन करणे, डिझाईन करणे, माहिती शोधणे अशा अनेक क्षमता आहे. त्यामुळे कामाची गती वाढली आहे. | 2 |
| (२) | (१) रौलेट कायद्याच्या निषेधार्थ १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला मैदानात सभा आयोजित करण्यात आली.<br>(२) या सभेला मोठ्या संख्येने लोक एकत्र आले होते. इंग्रज अधिकारी जनरल डायरने सभेसाठी जमलेल्या लोकांवर अमानुष गोळीबार केला.<br>(३) त्यामध्ये शेकडो स्त्री-पुरुष मृत्यू पावले. अनेकजण जखमी झाले.<br>(४) या हत्याकांडाचा भारतभर निषेध केला गेला. रविंद्रनाथ टागोरांनी ब्रिटिश शासनाने दिलेल्या 'सर' या पदवीचा त्याग केला. भारतीय नेत्यांनी या अमानुष हत्याकांडाच्या चौकशीची मागणी केली. | 2 |
| (३) | (१) अमेरिकेच्या नेतृत्वाखालील नाटो करारास प्रत्युत्तर म्हणून रशियाने साम्यवादी देशांशी 'वार्सा करार' केला.<br>(२) साम्राज्यवादी व भांडवलशाही आक्रमणास शह देणे हा वॉर्सा कराराचा मुख्य उद्देश होता.<br>(३) पोलंडची राजधानी वॉर्सा येथे आठ राष्ट्रांची परिषद झाली.<br>(४) मैत्री, सहकार्य व परस्पर मदतीचा करार करण्यात आला. सामुदायिक सुरक्षिततेवर भर देण्यात येऊन संयुक्त सेनादल उभारण्यात आले. | 2 |
| उ. ४. | **खालील प्रश्नांची ४० ते ५० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | |
| (१) | (१) अमेरिकेच्या नेतृत्वाखालील नाटो करारास प्रत्युत्तर म्हणून रशियाने साम्यवादी देशांशी 'वॉर्सा करार' केला.<br>(२) साम्राज्यवादी व भांडवलशाही आक्रमणास शह देणे हा वॉर्सा कराराचा मुख्य उद्देश होता.<br>(३) ११ ते १४ मे १९५५ रोजी पोलंडची राजधानी वॉर्सा येथे रशिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, अल्बानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, रुमानिया आणि पोलंड अशा आठ राष्ट्रांची परिषद झाली.<br>(४) मैत्री, सहकार्य व परस्पर मदतीचा करार करण्यात आला.<br>(५) सामुदायिक सुरक्षिततेवर भर देण्यात येऊन संयुक्त सेनादल उभारण्यात आले.<br>(६) क्षेपणास्त्रे व शस्त्रनिर्मितीवर भर देण्यात आला.<br>(७) परस्परांमध्ये आर्थिक व सांस्कृतिक सहकार्य वृध्दींगत करण्याचे ठरले. | 3 |

| | | |
|---|---|---|
| (२) | जागतिकीकरणाच्या प्रसारासाठी आर्थिक स्थिती बरोबरच राजकीय व्यवस्था प्रभावित होणे आवश्यक आहे. कारण आर्थिक व्यवस्था राजकीय व्यवस्थेशी निगडित असते. म्हणून जागतिकीकरण प्रक्रियेत राजकीय प्रभाव असल्यामुळे महत्त्वाचे ठरते.<br>(१) **साम्यवाद, समाजवादाचा प्रभाव कमी झाला** - दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने भांडवलशाहीचा प्रसार केला. तर सोव्हिएत रशियाने आंतरराष्ट्रीय साम्यवादी राज्यक्रांतीचा नारा दिला. परंतु साम्यवाद समाजवादातील मूलभूत त्रुटींमुळे आणि विशेषत: स्टॅलिनच्या मृत्यूनंतर सोव्हिएत रशियाच्या राजवटीला उतरती कळा आली. भांडवलशाहीला होणारा साम्यवादाचा अडसर दूर झाला. अमेरिका ही एकमेव महासत्ता बनली. अमेरिकेने खुल्या आर्थिक धोरणाचा अवलंब केला.<br>(२) **लोकशाही राज्यव्यवस्थेचा प्रभाव** - साम्यवाद, समाजवादाची जागा लोकशाही विचारप्रणालीने घेतली. लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्यास अग्रक्रम दिला जातो. व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी लोकशाही राज्यव्यवस्था अत्यंत प्रेरणादायी ठरते. लोकशाहीत मूलभूत स्वातंत्र्याबरोबर खुली अर्थव्यवस्था अटळ असते आणि खुली अर्थव्यवस्था जागतिकीकरणाला साह्यभूत ठरते. खुल्या अर्थव्यवस्थेत लोकशाहीवर भांडवलशाहीचे वर्चस्व असते. अमेरिका व युरोपात लोकशाही असून त्यांचे धोरण खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे आहे. त्यामुळे जागतिकीकरणाला पाठबळ मिळते.<br>(३) **जागतिकीकरणाचा विळखा** - विकसित देशांना उत्पादनासाठी बाजारपेठ हवी असते. ती नियंत्रित अर्थव्यवस्थेत शक्य नसते. म्हणून त्यांनी जागतिकीकरणाचा आग्रह धरला. भांडवल, तंत्रज्ञान व व्यवस्थापन याबाबतीत काही राष्ट्रे अविकसित होती. तर काही भारतासारखी विकसनशील राष्ट्रे होती. या देशांवर कर्जाचा बोजा वाढून त्यांच्यावर 'आर्थिक गुलामगिरी' पत्करण्याची वेळ आली. त्यांना जागतिकीकरण हा विकासाकडे घेऊन जाणारा मार्ग वाटला. त्यामुळे अनेक देशांनी जागतिकीकरणाचा स्वीकार केला. अशा देशांची संख्या मोठी असली तरी त्यांच्यावर प्रगत देशांचा दबाव अधिक आहे. त्यांच्या अडवणुकीच्या धोरणांचा विळख्यात अविकसित व विकसनशील राष्ट्रे सापडली आहेत. असे असले तरी जागतिकीकरणातून सुटका नाही.<br>(४) **राजकीय भ्रष्टाचार** - जागतिकीकरणामुळे राजकीय सत्ता आपल्या हाती ठेवण्यासाठी राजकीय नेत्यांत स्पर्धा सुरु झाली. सत्ताप्राप्तीमुळेच आर्थिक लाभ उचलता येतात; याची कल्पना आल्याने राजकारणात व्यावसायिकांनी व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींनी प्रवेश केला. राजकरणाचे गुन्हेगारीकरण झाले. लोककल्याणाचे तत्त्व मागे पडून भ्रष्टाचाराचा मार्ग अंबलबिला गेला. राजकारण हे भ्रष्टाचाराचे मूळ ठरत जाऊन नीतीमूल्यांचा ऱ्हास होत आहे. | 3 |
| (३) | (१) व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने इ. स. १९०५ मध्ये प्रशासकीय अडचण हे कारण पुढे करून मुस्लिम बहुसंख्याकांचा पूर्व बंगाल व हिंदू बहुसंख्यांकाचा पश्चिम बंगाल अशी बंगालची फाळणी केली.<br>(२) लॉर्ड कर्झनचा बंगालच्या फाळणी मागील खरा हेतू हिंदू- मुस्लिम अशी फूट पाडून राष्ट्रीय चळवळ कमकुवत करणे हा होता.<br>(३) बंगालच्या फाळणी विरोधात वंगभंग आंदोलन उदयाला आले या आंदोलनाचे नेतृत्व सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी केले.<br>(४) १६ ऑक्टोबर, १९०५ हा फाळणी अंमलात आणण्याचा दिवस 'राष्ट्रीय शोक दिन' म्हणून पाळण्यात आला. वर्तमानपत्रे, सभा व परिषदांच्या मधून बंगालच्या फाळणीचा निषेध केला. ऐक्याचे प्रतीक म्हणून रविंद्रनाथ टागोरांच्या कल्पनेतील रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. स्वदेशीचा पुरस्कार | 3 |

करुन परदेशी मालावर बहिष्कार घालण्यात आला. सरकारी शाळा महाविद्यालयांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा उघडण्यात आल्या. अल्पावधीमध्ये ही चळवळ राष्ट्रव्यापी बनली. बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या 'आनंदमठ' कादंबरीतील 'वंदे मातरम्' हे गीत अनेक तरुण गाऊ लागले.

(५) ब्रिटिश सरकारने प्रमुख नेत्यांना तुरुंगात टाकले.

(६) तरीही आंदोलनाची तीव्रता कमी झाली नाही. शेवटी १२ डिसेंबर, १९११ रोजी ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्ज यांनी 'दिल्ली' येथे भव्य दरबार भरवून बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली.

उ. ५. **खालील प्रश्नांची ६० ते ८० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)**

(१) आफ्रिका खंडाचा अंतर्गत भाग जगासमोर आल्यानंतर आफ्रिका खंडामध्ये साम्राज्यविस्तार करण्याच्या उद्देशाने अनेक युरोपीय राष्ट्रे आली. आफ्रिकेतील महत्त्वाच्या भागांवर आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या युरोपीय राष्ट्रांपैकी इंग्लंड हे महत्त्वाचे राष्ट्र होते. इंग्लंडने आफ्रिकेतील पुढील भागांवर आपले वर्चस्व निर्माण केले. **4**

(१) युरोपातील विविध राष्ट्रांमध्ये वसाहतीसाठी चाललेल्या स्पर्धेत ब्रिटिशही मागे राहिलेले नाहीत.

(२) ब्रिटिशांनी आफ्रिकेतील गुलामांच्या व्यापारासाठी सिएरा-ले-ओनमध्ये ठाणी स्थापन केली व पुढे चालून मुक्त केलेल्या निग्रो गुलामांसाठी तेथेच वसाहती स्थापन केली.

(३) १९०६ पर्यंत इंग्लंडच्या वर्चस्वाखाली केप ऑफ गुड होप, नाताळ, ट्रान्सवाल, ऱ्होडेशिया, ऑरेंज फ्री स्टेट, न्यासालँड, झांझीबार, पंम्बा व युगांडा इत्यादी प्रदेश आलेले होते.

(४) १९२० मध्ये केप ऑफ गुड होप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट, ट्रान्सवाल ह्या चार ब्रिटिश वसाहतींचे एकत्रीकरण होऊन त्यांचे एक संघराज्य निर्माण झाले.

(२) (१) **युरोपीय राष्ट्रांच्या आर्थिक समस्या :** दुसऱ्या महायुद्धाने हजारो शहरे, औद्योगिक केंद्रे नष्ट झाली. प्रचंड आर्थिक हानी झाली. महायुद्धात अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया या दोस्त राष्ट्रांनी जर्मनी, इटली, जपान या राष्ट्रांचा पराभव केला. महायुद्धामुळे बेकारी, रोगराई, वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. **4**

(२) **अमेरिका आर्थिकदृष्ट्या प्रबळ :** अमेरिकेच्या भूभागवर युद्ध लढले गेले नसल्याने तेथील जनजीवन सुरळीत चालू होते. अमेरिकेने युद्धमान राष्ट्रांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा करुन प्रचंड नफा मिळवला. त्यामुळे अमेरिका आर्थिकदृष्ट्या प्रबळ महासत्ता बनली.

(३) **रशिया लष्करीदृष्ट्या प्रबळ :** रशियाने विध्वंसक धोरणाचा स्वीकार करुन जर्मनीची विजयी घोडदौड खंडीत केली होती. हिटलरचा पराभव झाल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात रशियास महत्त्व प्राप्त झाले होते.

(४) **अमेरिका आणि रशियात तात्पुरती मैत्री :** जर्मनीने अनाक्रमणाचा करार मोडून इ.स.१९४१ मध्ये रशियावर केलेले आक्रमण आणि अमेरिकेच्या पर्ल हार्बर या नौदल तळावर डिसेंबर, १९४१ मध्ये जपानने केलेला हल्ला या दोन घटकांमुळे ही दोन्ही राष्ट्रे एकमेकांच्या जवळ आली.

(५) **तात्त्विक विचारसरणीतील मतभेद :** दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत रशिया साम्यवादी जगताचे स्वप्न सत्यात उतरवू पाहत होता. तर अमेरिका जगाला साम्यवादी लाटेपासून थोपवून लोकशाही व भांडवलशाहीचे रक्षण करु पाहत होता. जगभर मानसिक तनाव वाढीस लागला. अमेरिका व

| | | |
|---|---|---|
| | रशिया यांच्यातील आंतरराष्ट्रीय तणावाच्या परिस्थितीलाच 'शीतयुद्ध' म्हंटले जाते. अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकीवर अण्वस्त्र हल्ला करुन आपली अण्वस्त्र सिद्धता दाखवून दिली. तर रशियाने १९५३ मध्ये अणुचाचणी करुन आपणही या क्षेत्रात प्रबळ असल्याचे दाखवून दिले. | |
| | (६) **अमेरिका व रशिया या महासत्तांमधील प्रभुत्व :** दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व रशिया वगळता आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडू शकतील अशा सत्ता उरल्या नाहीत. महायुध्दात इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटलीचे अपरिमीत नुकसान झाले. अणुबॉम्बच्या धक्क्याने जपान कोलमडला. अशा पार्श्वभूमीवर अमेरिका व रशिया या महासत्ता आपला प्रभाव वाढवू लागल्या. | |
| (३) | आशिया व आफ्रिका खंडातील वसाहतीमध्ये निर्वसाहतीकरणाला अनुकूल पार्श्वभूमी निर्माण होण्यासाठी खालील घटना महत्त्वपूर्ण होत्या. | 4 |
| | (१) इ.स. १९०५ मध्ये जपान सारख्या छोट्या राष्ट्राने रशिया सारख्या बलाढ्य राष्ट्राचा पराभव केला. युरोपीयन राष्ट्रेही पराभूत होतात ही बाब आशियायी लोकांच्या लक्षात आल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. | |
| | (२) अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन आणि फ्रॅन्कलिन रुझवेल्ट यांनी पुरस्कृत केलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्वामुळे वसाहतीमध्ये राष्ट्रवादी संघटना उदयास येऊन राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली. | |
| | (३) 'आशिया' आशियायी लोकांसाठी आहे. परकीय सत्तांच्या वर्चस्वातून त्यांना मुक्त करणे आपले उदात्त कर्तव्य आहे. ही भूमिका घेऊन जपान वसाहतवादी युरोपीयन राष्ट्रांच्या विरोधात उभे राहिले. | |
| | (४) पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात आशिया खंडातील राष्ट्रांचे सैन्य दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लढले. त्यामुळे युद्ध समाप्तीनंतर राजकीय स्वातंत्र्य मिळेल अशी आशा त्यांना होती. | |
| | (५) दुसऱ्या महायुद्धात वसाहतवादी राष्ट्रे विजयी झाले. महायुद्धात त्यांची प्रचंड आर्थिक हानी होऊन ते दुबळे झाले. परिणामी वसाहती ताब्यात ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात राहिले नाही. | |
| | (६) दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांचा महासत्ता म्हणून उदय झाला. त्या सत्ता वसाहतवाद विरोधी होत्या. या अनुकूल परिस्थितीमुळे वसाहतीमध्ये निर्वसाहतीकरणास सुरुवात झाली. | |
| | **राज्यशास्त्र** | |
| उ. ६. | **रिकाम्या जागा भरा :** | |
| (१) | भारताने **संघराज्य** शासन पध्दत स्वीकारली आहे. | 1 |
| (२) | **सामाजिक समानता** नसेल तर राजकीय समानता निरर्थक ठरू शकते. | 1 |
| (३) | **ताराबाई शिंदे** यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक लिहिले. | 1 |
| उ. ७. | **एका वाक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही तीन)** | |
| (१) | भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, बौध्द, जैन, ख्रिश्चन, पारशी, ज्यू इ. अनेक धर्माचे लोक राहतात. | 1 |

| | | |
|---|---|---|
| (२) | प्रादेशिक विषमतेमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी तीन मार्गांचा अवलंब केला जातो.<br>(१) समतोल विकास<br>(२) साधनसंपत्तीमध्ये न्याय वाटा<br>(३) सत्तेत भागीदारी | 1 |
| (३) | तुम्ही जेथे जन्माला येता त्यावरुन तुमचा धर्म निश्चित होतो. तर तुम्ही ज्या धर्मात जन्माला येता त्यावरुन तुमची भाषा निश्चित होते. | 1 |
| (४) | अनेक देशांमध्ये काही प्रदेश इतरांपेक्षा जास्त प्रगत असतात आणि काही प्रदेशांचा विकास कमी झालेला असतो. यालाच 'प्रादेशिक विषमता' असे म्हणतात. | 1 |
| (५) | भारतासारख्या समाजांमध्ये तर पूर्वापार नेहमीच भाषा, प्रदेश, धर्म, पंत यांची विविधता राहिली आहे. | 1 |
| उ.८. | **चूक की बरोबर सहकारण सांगा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | **बरोबर -**<br>कारण; (१) भारतासारख्या समाजामध्ये तर पूर्वापार नेहमीच भाषा, प्रदेश, धर्म, पंत यांची विविधता राहिली आहे.<br>(२) अशी विविधता असूनसुद्धा ऐक्य भावना साकारता येते. हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याने दाखवून दिले आहे. | 2 |
| (२) | **चूक -**<br>कारण; (१) लोकांचा सहभाग हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा असतो.<br>(२) राज्यकर्ते लोकांकडून निवडलेले असावेत हे तर लोकशाहीत आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर नागरिकांनी नियमितपणे शासनाच्या कारभारावर लक्ष ठेवणे गरजेचे असते.<br>(३) सार्वजनिक प्रश्नांवर स्वतःचे मत तयार करून नागरिकांनी शासनावर प्रभाव पाडावा अशी अपेक्षा लोकशाहीत केली जाते. | 2 |
| (३) | **बरोबर -**<br>कारण; (१) भारतीय समाज हा अनेक जातींचा मिळून बनलेला असून काही जाती उच्च तर काही कनिष्ठ मानल्या गेल्या आहेत.<br>(२) इतकेच नाही तर पारंपरिक जातिव्यवस्थेत काही जाती या अस्पृश्य मानलेल्या होत्या.<br>(३) पूर्वी कनिष्ठ मानलेल्या जातींमध्ये आजही कनिष्ठ व्यवसायांचे आणि कमी उत्पन्न असलेल्यांचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त आहे.<br>(४) उच्च शिक्षणाचे प्रमाणही या जातींमध्ये कमी आहे. म्हणून जाती व्यवस्था ही एक उतरंड आहे. | 2 |

| | | |
|---|---|---|
| उ.९. | **खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणताही एक)** | |
| (१) | (१) भारतातसुद्‌धा संविधानाने तशी हमी दिली आहे.<br>(२) त्याखेरीज स्त्रियांच्या हिताच्या तसेच त्यांना आपला सर्वांगीण विकास साधता येईल अशा अनेक योजना सरकारमार्फत राबविल्या जातात.<br>(३) समाजामध्ये समानता प्रसारीत करण्यासाठी 'स्त्रियांच्या संघटना' व 'सामाजिक जागृती मोहिमा' राबविल्या आहेत.<br>(४) स्त्रियांना संरक्षण देण्याबाबतच्या कायदेशीर तरतूदी, विकास योजनांची अंमलबजावणी, सत्तेत वाटा मिळावा म्हणून खास तरतूदी, असे विविध उपाय स्त्री-पुरुष विषमता कमी करण्यासाठी केलेले आहेत. | 2 |
| (२) | (१) लोकशाहीत प्रत्येक व्यक्तिचे स्वातंत्र्य फार महत्त्वाचे मानले जाते.<br>(२) आपला विकास करुन घेण्याची प्रत्येक व्यक्तिला पुरेशी संधी असणे हे लोकशाहीत अपेक्षित असते. पण प्रत्याक्षात मात्र त्यावर मर्यादा पडलेल्या दिसतात.<br>(३) जसे संविधानाद्वारे सर्व व्यक्तिंना अधिकार देणे हे लोकशाहीत अपेक्षित असते. पण असे अधिकार समाजाला मान्य नसतील तर व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा येतात.<br>(४) अनेक वेळा लोकशाहीच्या नावाखाली बहुसंख्यांक गटांचे म्हणणे इतर थोड्या लोकांवर लादले जाते, त्यांनी ते स्वीकारले पाहिजे असा आग्रह धरला जातो. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा येतात.<br>(५) काहीवेळा नागरीकांच्या सुरक्षेच्या उपाययोजना पार पडत असताना व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा येऊ शकतात. | 2 |
| | ❖❖❖❖ | |